# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Sr. No. № 002874

## CERTIFICATE

This is to certify that University approval is given to ***Smt. Gangabai Khivaraj Ghodawat Kanya Mahavidyalaya (Arts & Commerce), Jaysingpur, Tal-Shirol, Dist. Kolhapur*** to conduct the following courses for the academic year 2021-22.

### Faculty of Humanities and Commerce & Management

**BA-I Grant-in-aid Division-1** **Permanent Affiliation**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | एनजीसी-३५८५/८९०१/विशि-२, दिनांक. १३ ऑगस्ट, १९८५ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/एसजीबी/१०७८१, दिनांक. १६ फेब्रुवारी, २००५ |
| **Compulsory** | - | इंग्रजी, मराठी, अर्धमागधी, एस.टी.डी. |
| **Optional** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्धमागधी, मानसशास्त्र, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र. |

**BA-I Non grant Division-1**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | एनजीसी-२००१/तुकडया/(३४५/०१)/मशि, दिनांक १२/०४/२००२. |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी.२/गौरकर /१०८५६, दि. १९ मार्च, २००३ |
| **Compulsory** | - | इंग्रजी, मराठी, अर्धमागधी, एस.टी.डी. |
| **Optional** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्धमागधी, मानसशास्त्र, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र. |

**BA-II Grant-in-aid Division- 1** **Permanent Affiliation**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | एनजीसी-३५८५/८९०१/विशि-२, दिनांक. १३ ऑगस्ट, १९८५ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/एसजीबी/१०७८१, दिनांक. १६ फेब्रुवारी, २००५ |
| **Compulsory** | - | इंग्रजी, ए.आय.एच.सी., तर्कशास्त्र, सहकार, लोकप्रशासन, पर्यावरणअभ्यास. |
| **Optional/Special** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्धमागधी, मानसशास्त्र, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र. |

**BA-II Non grant Division-1**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | एनजीसी-२००१/तुकडया/(३४५/०१)/मशि-३, दिनांक १२/०४/२००२ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/गौरकर/११४५०, दिनांक १९/०३/२००३ |
| **Compulsory** | - | इंग्रजी, ए.आय.एच.सी., तर्कशास्त्र, सहकार, लोकप्रशासन, पर्यावरणअभ्यास. |
| **Optional/Special** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्धमागधी, मानसशास्त्र, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र. |

**BA-III Grant-in-aid Division- 1** **Permanent Affiliation**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | एनजीसी-३५८५/८९०१/विशि-२, दिनांक. १३ ऑगस्ट, १९८५ |
| **University Recent Approval** | - | शिवाजीवि/संलग्नता/टी-२/विद्यापरिषद वि.क्र.१०३, दि. १५ मे, २०१४ |
| **Compulsory** | - | इंग्रजी |
| **Special** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र. |

Registrar,
Shivaji University,
Kolhapur.

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Sr. № 002875



**BA-III Non grant Division-1**

Govt. Approval - एनजीसी-२००१/तुकडया/(३४५/०१)/मशि-३, दिनांक १२/०४/२००२
University Recent Approval - संलग्नता/टी-२/गौरकर/११४५०, दिनांक १९/०३/२००३
Compulsory - इंग्रजी
Special - इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र.

**B.Com.-I Grant-in-aid Division-1** **Permanent Affiliation**

Govt. Approval - एनजीसी-३५८५/८९०१/विशि-२, दिनांक. १३ ऑगस्ट, १९८५
University Recent Approval - संलग्नता/टी-२/एसजीबी/१०७८१, दिनांक. १६ फेब्रुवारी, २००५
Compulsory - बिझनेस कम्युनिकेशन-I (इंग्रजी आवश्यक), फायनन्शिअल अकौंटिंग, बिझनेस इकॉनॉमिक्स-I, प्रिन्सिपल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, इन्शुरन्स
Optional - प्रिन्सीपल ऑफ मार्केटींग, मराठी

**B.Com.-I Non grant Division-1**

Govt. Approval - एनजीसी-२००१/तुकडया/(३४५/०१)/मशि-३, दिनांक १२/०४/२००२
University Recent Approval - संलग्नता/टी-२/गौरकर/११४५०, दिनांक १९/०३/२००३
Compulsory - बिझनेस कम्युनिकेशन-I (इंग्रजी आवश्यक), फायनन्शिअल अकौंटिंग, बिझनेस इकॉनॉमिक्स-I, प्रिन्सिपल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, इन्शुरन्स
Optional - प्रिन्सीपल ऑफ मार्केटींग, मराठी

**B.Com.-II Grant-in-aid Division-1** **Permanent Affiliation**

Govt. Approval - एनजीसी-३५८५/८९०१/विशि-२, दिनांक. १३ ऑगस्ट, १९८५
University Recent Approval - संलग्नता/टी-२/एसजीबी/१०७८१, दिनांक. १६ फेब्रुवारी, २००५
Compulsory - बिझनेस कम्युनिकेशन-II (इंग्रजी आवश्यक), बिझनेस इकॉनॉमिक्स-II, को.ऑप. अकौंटिंग, फंडामेंटल ऑफ इंटरप्रिनरशिप, बिझनेस स्टॅटिस्टिक्स, मनी अॅण्ड फायनान्शियल सिस्टिम, पर्यावरणअभ्यास.

**B.Com.-III Grant-in-aid Division-1** **Permanent Affiliation**

Govt. Approval - एनजीसी-३५८५/८९०१/विशि-२, दिनांक. १३ ऑगस्ट, १९८५
University Recent Approval - संलग्नता/टी-२/एसजीबी/१०७८१, दिनांक १६ फेब्रुवारी, २००५
Compulsory - बिझनेस एनव्हायरन्मेंट, को-ऑप. डेव्हलपमेंट, बिझनेस रेग्युलेटरि फ्रेमवर्क, मॉडर्न मॅनेजमेंट प्रॅक्टिस.
Optional/Special - अॅडव्हान्स अकौंटन्सी पेपर १ व २, अॅडव्हान्स बँकींग पेपर १ व २

**BA- Part III Non Grant Subject**

Govt. Approval - क्रंमाक : शिविस-२००५/(१२/०५)/मशि-३ दि. २२ जून २००५.
University Recent Approval - संलग्नता/टी-२/KOP-४९/acs/००५२२ दि. ३०/०७/२०२१
Subject - मानसशास्त्र

----- * ** -----

Place : KOLHAPUR
Date : 09 AUG 2021
No 00189

Registrar,
Shivaji University,
Kolhapur.

# लट्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली.

स्व. आण्णासाहेब लट्ठे हे आपल्या हयातीतच लोकमान्य, विद्वत्मान्य व राजमान्य ठरले होते. कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये ते इंग्रजी विषयाचे नामवंत प्राध्यापक होते. कोल्हापूर संस्थानचे कार्यक्षम दिवाण व पूर्वीच्या मुंबई राज्याचे पहिले अर्थमंत्री या विविध नात्याने महाराष्ट्रात त्यांचा लौकिक होता. सुबत्तेच्या, स्पर्धेच्या जगात शिक्षणाशिवाय बहुजन समाजाला तरणोपाय नाही, हा द्रष्टेपणा त्यांच्याजवळ होता. त्या दृष्टीने बहुजनांच्या उन्नतीसाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या या ऋणातून अंशत: उतराई व्हावे या हेतूने १३ जून १९५१ रोजी 'लट्ठे एज्युकेशन सोसायटीची' स्थापना करुन स्व. आण्णासाहेब लट्ठे यांचे 'शैक्षणिक संस्थेच्या' रुपाने एक चिरंतन स्मारक उभारण्यात आले. संस्थेचे ब्रीद वाक्य 'सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र्य' असे आहे आणि त्यानुसार संस्थेची वाटचाल सुरु आहे.

लट्ठे एज्युकेशन सोसायटीने सर्वांगीण शिक्षणाचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवले असून आतापर्यंत कर्नाटक व महाराष्ट्र राज्यात एकूण ४१ विविध शाखा कार्यक्षमतेने चालविलेल्या आहेत. या विविध शाखांमध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शाळा, एक तंत्रनिकेतन, महिलांसाठी डी. एड्. महाविद्यालय, दोन कन्या महाविद्यालये, सहा महिला वसतिगृहे, एक रात्र महाविद्यालय, एक आयुर्वेदिक महाविद्यालय, एक विधी महाविद्यालय व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये यांचा समावेश आहे. तसेच बी.सी.एस्., बी.एस्.सी. बायोटेक्नॉलॉजी (एन्टायर) बी.एस्. सी. (कॉम्प्युटर सायन्स), एम्.ए.,एम्.कॉम., बी.सी.ए., एम्.एस्सी. (कॉम्प्युटर), एम.एस्.सी. (इलेक्ट्रॉनिक), एम्. एस्सी. (फिजिक्स) इ. अभ्यासक्रम शिकविण्याची उत्तम सुविधा संस्थेने विविध शाखेत उपलब्ध करून दिली आहे.

## श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर.

## – कला व वाणिज्य –

शिक्षण ही माणसाला जीवनदृष्टी देणारा, त्यांच व्यक्तिमत्व घडविणारा सर्वात महत्वाचा संस्कार आहे. या संस्कारानेच आपले जीवन प्रगत होत तस प्रगल्भ होत. बदलत्या काळाची आव्हाने स्विकारत जीवनाची आणि ज्ञानाची असंख्य क्षेत्र शिक्षणाने उजळुन टाकले आहेत. महाविद्यालयीन स्तरावर वेगवेगळया रूपातुन हे शिक्षण देऊन विद्यार्थी मनावर हा शिक्षण संस्कार रूजविण्याचा प्रयत्न केला जातो.

देशात आणि महाराष्ट्र राज्यात स्त्री शिक्षणाची वाटचाल प्रभावीपणे सुरू आहे. हे लक्षात घेऊनच शिरोळ तालुक्यातील जयसिंगपूर व आसपासच्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींची उच्च शिक्षणाची गरज पूर्ण व्हावी या उद्देशाने लट्ठे एज्युकेशन सोसायटीने शिक्षकदिनी ५ सप्टेंबर १९८५ या रोजी जयसिंगपूर कन्या महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयामुळे अनेक विद्यार्थिनींना पदवी पर्यंतचे शिक्षण घेणे सोयीचे झाले. शिरोळ– नृसिंहवाडी मार्गावर उभ्या असलेल्या या महाविद्यालयातून गेल्या ३५ वर्षात जवळपास ९००० विद्यार्थिनींनी या महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली आहे. शैक्षिणिक वर्ष सन २०२० – २१ पासून या महाविद्यालयात पदव्युत्तर (एम्. कॉम.) विभागही सुरू होत आहे. तसेच विद्यार्थिनींच्या कला गुणांना वाव देण्यासाठी याच वर्षापासून कौशल्याधारीत व मुल्याधारीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस आहे.

सांस्कृतिक वातावरण, मुल्याधारीत शिक्षण, चर्चासत्रे व कार्याशाळा यांचे आयोजन या सर्वातून विद्यार्थिनी मन अधिक सुजाण आणि संपन्न बनविण्यासाठी हे महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे.

## वरिष्ठ महाविद्यालय (Senior College)

### –कला विभाग–

या विभागामध्ये पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम शिकविला जातो. हा अभ्यासक्रम एकूण तीन वर्षांचा असून बी. ए. भाग १, बी. ए. भाग २, आणि बी. ए. भाग ३ या तीन वर्गाच्या परीक्षा सेमीस्टर पद्धतीनुसार शिवाजी विद्यापीठामार्फत घेतल्या जातात.

प्रवेशासाठी पात्रता :

बी. ए. भाग – १ (**B. A. Part I**)

१) इंग्रजी, अन्य एक भाषा व कोणतेही चार वैकल्पिक विषय घेऊन महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण   किंवा

२) इंग्रजी व कला शाखेचे कोणतेही तीन वैकल्पिक विषय व २०० गुणांचा व्होकेशनल अभ्यासक्रम घेऊन महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची इ. १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण   किंवा

३) इतर विद्यापीठाची अथवा परीक्षा मंडळाची शिवाजी विद्यापीठाने समकक्ष (Equivalent) मान्य केलेली परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस बी. ए. भाग १ या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळू शकेल. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडून पात्रता मिळेपर्यत तिचा प्रवेश केवळ तात्पुरता राहील.

बी. ए. भाग – २ **(B. A. Part II)**

शिवाजी विद्यापीठाची बी. ए. भाग १ ची परीक्षा अथवा अन्य विद्यापीठाची शिवाजी विद्यापीठाने बी. ए. भाग–१ ला समकक्ष (Equivalent) मानलेली परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस बी. ए. भाग–२ मध्ये प्रवेश मिळू शकेल. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. भाग–१ सेमिस्टर २ च्या परीक्षेमध्ये ए. टी. के. टी. मिळालेल्या विद्यार्थिनीही बी. ए. भाग–२ साठी प्रवेश मिळविण्यास पात्र राहतील.

बी. ए. भाग – ३ **(B. A. Part III)**

शिवाजी विद्यापीठाची बी. ए. भाग २ ची परीक्षा अथवा अन्य विद्यापीठाची शिवाजी विद्यापीठाने बी. ए. भाग–२ ला समकक्ष (Equivalent) मानलेली परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस बी. ए. भाग–३ मध्ये प्रवेश मिळू शकेल. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. भाग–२ सेमिस्टर ४ च्या परीक्षेमध्ये ए. टी. के. टी. मिळालेले त्या विद्यार्थिनीही बी. ए. भाग–३ मध्ये प्रवेश मिळविण्यास पात्र राहतील.

अभ्यासक्रमविषयक व परीक्षा पद्धती –

विशेष सूचना –

बी. ए. भाग १ ला निवडलेल्या चार ऐच्छिक विषयापैकीच बी. ए. भाग २ ला दोन ऐच्छिक विषय निवडता येतील. बी. ए. भाग २ ला निवडलेल्या दोन ऐच्छिक विषयापैकीच बी. ए. भाग ३ ला एक स्पेशल विषय निवडावा लागतो. हे लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी बी. ए. भाग १ साठी विषयाची निवड काळजीपूर्वक करावी.

विद्यार्थिनीने एकदा निवडलेला विषय तिला बदलता येणार नाही. काही अपरिहार्य विशेष परिस्थितीत तो बदलावयाचा असेल तर मा. प्राचार्यांच्या व संबंधित विषय विभाग प्रमुखाच्या लेखी पूर्वसंमतीने ३० जुलै पर्यंतच विषय बदलता येईल. प्रवेशाच्या वेळी निवडलेले विषय हेच विद्यापीठाच्या परीक्षा फॉर्ममध्ये भरणे बंधनकारक आहे. कोणत्याही विषयामध्ये परस्पर बदल केल्यास होणाऱ्या नुकसानीस संबंधीत विद्यार्थीनी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

बी. ए. भाग - १ (सेमिस्टर १ आणि २)

महाराष्ट्र शासनाने या महाविद्यालयासाठी बी. ए. भाग -१ साठी दोन तुकड्या मंजूर केल्या असून एक तुकडी अनुदानित व दुसरी तुकडी विनाअनुदानित आहे. अनुदानित तुकडीतील प्रवेश पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या विद्यार्थिनीस विनाअनुदानित तुकडीमध्ये प्रवेश घ्यावा लागेल व त्याची संपूर्ण फी एकाच वेळी भरावी लागेल. याबाबतीत विद्यार्थिनींची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

शिवाजी विद्यापीठ सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून बी. ए. भाग १ ची परीक्षा सेमिस्टर पद्धतीने सीबीसीएस (CBCS) पॅटर्न प्रमाणे परीक्षा सुरू केली आहे. या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीस सहा विषय निवडावे लागतील. यापैकी दोन विषय आवश्यक (Compulsory) व चार विषय ऐच्छिक (Optional) असतील. या चार ऐच्छिक विषयांपैकी एक भाषा विषय असलाच पाहिजे. प्रत्येक विषयाची परीक्षा ही सेमिस्टर पद्धतीने विद्यापीठामार्फत घेतली जाईल. पहिल्या सत्रात पहिली सेमिस्टर परीक्षा ऑक्टोबर/नोव्हेंबर मध्ये घेण्यात येईल व दुसऱ्या सत्रात दुसरी सेमिस्टर परीक्षा मार्च/एप्रिल मध्ये घेण्यात येईल. प्रत्येक सेमिस्टरमध्ये प्रत्येक विषयाची ५० गुणांची लेखी परीक्षा विद्यापीठांमार्फत घेतली जाईल. विद्यार्थिनींना उत्तीर्ण होण्यासाठी लेखी परीक्षेत ५० पैकी किमान १८ गुण मिळविणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाने सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सेमिस्टर १ साठी ''लोकशाही, निवडणूक व सुशासन'' व सन २०१८-१९ पासून सेमिस्टर २ साठी ''कार्यक्रम किंवा उपक्रम व्यवस्थापन'' या विषयांचा समावेश सक्तीचा करणेत आला आहे. हे दोन्ही विषय सर्व विद्यार्थ्यांनींनी स्वयंअध्ययन पद्धतीने शिकायचे आहेत. सेमिस्टर १ साठी ''लोकशाही निवडणूक व सुशासन'' या विषयाची ५० गुणांची परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्यात येईल. सेमिस्टर २ साठी ''कार्यक्रम किंवा उपक्रम व्यवस्थापन'' या विषयाची ५० गुणांची परीक्षा मार्चमध्ये घेण्यात येईल. या दोन्ही परीक्षेत ५० गुणांचे वैकल्पिक प्रश्न असतील. विद्यार्थ्यांनींना या परीक्षेत उत्तीर्ण होणेसाठी किमान २० गुण मिळविणे आवश्यक आहे.

या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयात खालील विषयांच्या अध्यापनाची सोय आहे.

आवश्यक विषय (Compulsory Subjects)

१) इंग्रजी (English)

२) मराठी/अर्धमागधी/एस. टी. डी. यापैकी कोणताही एक विषय (Marthi/Ardhamagadhi/STD)

ऐच्छिक विषय (Optional Subjects)

या महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विविध ऐच्छिक विषयांची विभागणी एकूण पाच गटात केलेली आहे. यापैकी कोणतेही चार विषय विद्यार्थिनीला निवडावे लागतील. परंतु अशी निवड करताना निवडलेल्या चार ऐच्छिक विषयात किमान एक भाषा विषय आणि एक सामाजिकशास्त्र विषय असलाच पाहिजे. त्याचप्रमाणे एका गटातील दोन विषयांपैकी एकाच विषयाची निवड करावी.

विषय गट -

१) मराठी (Marathi) किंवा मानसशास्त्र (Psychology)

२) हिंदी (Hindi) किंवा अर्धमागधी (Ardhamagdhi)

३) इंग्रजी (English) किंवा भूगोल (Geography)

४) अर्थशास्त्र (Economics) किंवा राज्यशास्त्र (Political Science)

५) इतिहास (History) किंवा समाजशास्त्र (Sociology)

विषयांची निवड करताना घ्यावयाची काळजी

१) प्रवेशप्रक्रिया MKCL मार्फत होत असल्याने एकदा प्रवेश घेतल्यानंतर घेतलेल्या विषयात कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

२) बी. ए. भाग १ साठी चार ऐच्छिक विषय निवडत असताना १२ वी आर्टस्मध्ये असणारे विषय विचारात घेऊनच विषय निवडावेत.

३) विद्यार्थिनींचा विषय निवडीचा अंतिम अधिकार महाविद्यालयाकडील प्रवेश समितीकडे राहील.

**Shivaji University, Kolhapur**

**Choice Based Credit Sytem (CBCS)**

**B. A. Part I – Sem I & II** (Implemented from academic year 2018-19)

**Ability Enhancement Compulsory Course**

| Sem I | | Sem II | |
|---|---|---|---|
| AECC 1 | English | AECC 2 | English |

**Core Generic Elective**

| Sem I | | Sem II | |
|---|---|---|---|
| **CGE** | | | |
| CGE – 1 | Marathi | CGE –2 | Marathi |
| CGE –3 | Hindi | CGE –4 | Hindi |
| CGE –7 | Ardhmagadhi | CGE –8 | Ardhmagadhi |
| CGE –19 | Science, Tech. and Development (STD) | CGE –20 | Science, Tech. and Development (STD) |

**Discipline Specific Core Course (DSC)**

| **DSC A** | | | |
|---|---|---|---|
| Sem I | | Sem II | |
| **DSC** – A1 | Marathi – I | **DSC** – A13 | Marathi – II |
| **DSC** – A2 | Hindi – I | **DSC** – A14 | Hindi – II |
| **DSC** – A3 | English – I | **DSC** – A15 | English – II |
| **DSC** – A6 | Ardhmagadhi– I | **DSC** – A18 | Ardhmagadhi– II |
| **DSC B** | | | |
| **DSC** – B1 | History – I | **DSC** – B15 | History – II |
| **DSC** – B2 | Sociology– I | **DSC** – B16 | Sociology– II |
| **DSC** – B3 | Economics– I | **DSC** – B17 | Economics– II |
| **DSC** – B4 | Political Science– I | **DSC** – B18 | Political Science– II |
| **DSC** – B6 | Psychology – I | **DSC** – B20 | Psychology – II |
| **DSC** – B10 | Geography – I | **DSC** – B24 | Geography – II |

**DSC:**Discipline Specific Core Course - Candidate can opt four courses (Subjects) from DSC.However, Candidate shall opt for at least one language course (subject) from DSC.

**CGE :** Compulsory Generic Elective - Candidate can opt any one course (Subject).

**AECC :** Ability Enhancement Core Course (Compulsory English).

**(A) Non-Credit Self Study Course : Compulsory Civic Courses (CCC)**
**For Sem I: CCC – I :** Democracy, Elections and Good Governance
**(B) Non-Credit Self Study Course : Skill Development Courses (SDC)**
**For Sem II: SDC – I :** Any one from following (i) to (v)
i) Business Communication & Presentation ii) Event management iii) Personality Development, iv) Yoga & Physical Management v) Resume, Report & proposal writing

बी. ए. भाग – २ (सेमिस्टर ३ आणि ४)

या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीस सात विषयांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. यापैकी दोन विषय आवश्यक (Compulsory), चार विषय ऐच्छिक (Optional) व एक विषय 'पर्यावरण अभ्यास' हा सक्तीचा विषय घेणे आवश्यक आहे.

आवश्यक विषय **(Compulsory Subjects)-**

१) इंग्रजी (English)

२) तर्कशास्त्र / सहकार / प्राचीन भारताचा इतिहास आणि संस्कृती/ लोकप्रशासन या चार I.D.S. विषयांपैकी एका विषयाची निवड करावी लागेल. I.D.S. विषय निवडताना खालील दक्षता घ्यावी. जे दोन ऐच्छिक विषय विद्यार्थिनीने निवडलेले असतील त्या ऐच्छिक विषयांपैकी किमान एक ऐच्छिक विषय I.D.S.विषयाला पूरक असणे आवश्यक आहे. जसे

**I.D.S.** विषय गट

१) तर्कशास्त्र (Logic)

मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्धमागधी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास.

२) सहकार (Co-operation)

अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र.

३) प्राचीन भारताचा इतिहास आणि संस्कृती (AIHC)

इतिहास, हिंदी, अर्धमागधी.

४) लोकप्रशासन (Public Administration)

अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र.

(उदा. एखाद्या विद्यार्थिनीने हिंदी आणि भूगोल हे दोन विषय निवडले असतील तर त्या विद्यार्थिनीस तर्कशास्त्र किंवा प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती या दोन I.D.S. विषयापैकी कोणताही एक विषय निवडता येतो.)

३) पर्यावरण अभ्यास (Environmental Studies)

मा. सर्वोच्य न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठ अनुदान मंडळाने पर्यावरण अभ्यास हा विषय बी. ए. भाग–२ या वर्गासाठी सन २००५–०६ या शैक्षणिक वर्षापासून अनिवार्य केला आहे. पर्यावरण अभ्यास या विषयामध्ये उत्तीर्ण झाल्याशिवाय विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र दिले जात नाही. या विषयाची परीक्षा १०० गुणांची असून त्यापैकी ७० गुणांची लेखी परीक्षा विद्यापीठामार्फत मार्च / एप्रिल मध्ये घेतली जाईल.

विद्यार्थिनीला पास होण्यासाठी या लेखी परीक्षेत किमान २८ गुण मिळविणे आवश्यक आहे. उर्वरित ३० गुणांची परीक्षा क्षेत्र भेटीवर आधारित प्रकल्प (Project Wrok) असेल. विद्यार्थिनीला पास होण्यासाठी या परीक्षेत किमान १२ गुण मिळविणे आवश्यक आहे. हा विषय उत्तीर्ण झाल्यानंतर गुणपत्रिकेवर श्रेणी स्वरूपात (Grade) त्याचा निकाल दिला जातो.

ऐच्छिक विषय **(Optional Subjects)**

बी. ए. भाग –२ साठी एकूण दोन ऐच्छिक विषय विद्यार्थिनींना निवडावे लागतील (या दोन ऐच्छिक विषयांचे प्रत्येकी दोन पेपर्स असतील) बी. ए. भाग १ साठी निवडलेल्या चार ऐच्छिक विषयांमधून कोणतेही दोन ऐच्छिक विषय बी. ए. भाग २ साठी निवडता येतील. तसेच बी. ए. भाग ३ साठी विशेष स्तरावर जो विषय विद्यार्थिनीला निवडायचा असेल; तो विषय बी. ए. भाग २ च्या ऐच्छिक विषयांमध्ये असावा याची विद्यार्थिनींनी दक्षता घ्यावी. खालील चार गटातील ऐच्छिक विषयापैकी दोन विषय विद्यार्थिनीला निवडता येतील परंतु एका गटातील एकच विषय घेता येईल.

१) मराठी (Marathi)/ मानसशास्त्र (Psychology)

२) हिंदी (Hindi)/ अर्धमागधी (Ardhamagdhi)

३) इंग्रजी (English) / भूगोल (Geography)

४) अर्थशास्त्र (Economics) / राज्यशास्त्र (Political Science)

५) इतिहास (History) / समाजशास्त्र (Sociology)

**Shivaji University, Kolhapur**

**Choice Based Credit System (CBCS) (Implemented from academic year 2019-20)**

**B. A. Part II - Sem III & IV**

**Ability Enhancement Compulsory Course**

| Sem III | | Sem IV | |
|---|---|---|---|
| AECC 3 | English | AECC 4 | English |

**Discipline Specific Core Course (DSC)**

| DSC C | | | |
|---|---|---|---|
| **DSC** – C1 | Marathi – III | **DSC** – C25 | Marathi – V |
| **DSC** – C2 | Marathi – IV | **DSC** – C26 | Marathi – VI |
| **DSC** – C3 | Hindi – III | **DSC** – C27 | Hindi – V |
| **DSC** – C4 | Hindi– IV | **DSC** – C28 | Hindi– VI |
| **DSC** – C5 | English – III | **DSC** – C29 | English – V |
| **DSC** – C6 | English– IV | **DSC** – C30 | English– VI |
| **DSC** – C11 | Ardhmagadhi– III | **DSC** – C35 | Ardhmagadhi– V |
| **DSC** – C12 | Ardhmagadhi– IV | **DSC** – C36 | Ardhmagadhi– VI |

DSC D

| | | | |
|---|---|---|---|
| **DSC – D**1 | History – III | **DSC – D**29 | History – V |
| **DSC – D**2 | History – IV | **DSC** – D30 | History – VI |
| **DSC** – D3 | Sociology – III | **DSC** – D31 | Sociology – V |
| **DSC** – D4 | Sociology – IV | **DSC** – D32 | Sociology – VI |
| **DSC** – D5 | Economics– III | **DSC** – D33 | Economics– V |
| **DSC** – D6 | Economics – IV | **DSC** – D34 | Economics – VI |
| **DSC** – D7 | Political Science – III | **DSC** – D35 | Political Science – V |
| **DSC** – D8 | Political Science – IV | **DSC** – D36 | Political Science – VI |
| **DSC** – D11 | Psychology – III | **DSC** – D39 | Psychology – V |
| **DSC** – D12 | Psychology – IV | **DSC** – D40 | Psychology – VI |
| **DSC** – D19 | Geography – III | **DSC** – D47 | Geography – V |
| **DSC** – D20 | Geography – IV | **DSC** – D48 | Geography – VI |

**Group of Inter Disciplinary Studies (IDS)**

| I .D. S. SUBJECT | At least one optional subject from the following (DSE) |
|---|---|
| A.I.H.C. | History, Hindi, Ardhamagadhi |
| Co-operation | Economics, Politics, History, Sociology |
| Logic (T) | All Subject |
| Public Administration | All Subject {Social Science} |

**AECC :** Ability Enhancement Core Course (Compulsory English)

**IDS :** Inter Disciplinary Studies - Candidate can opt any one course (Subject) as per group chart of IDS.

**DSC:** Discipline Specific Core Course - Candidate can opt any two courses (Subjects) from DSC - C & DSC - D Courses (subjects) which were opted in Part I (Sem I & Sem II)

बी. ए. भाग – ३ (सेमिस्टर ५ आणि ६)

या महाविद्यालयामध्ये विशेष स्तरावर खालील विषयांच्या अभ्यासक्रमाची सोय करण्यात आलेली आहे.

१) मराठी २) हिंदी ३) इंग्रजी ४) इतिहास ५) भूगोल ६) अर्थशास्त्र ७) मानसशास्त्र

या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीस बी. ए. भाग २ च्या अभ्यासक्रमासाठी निवडलेल्या ऐच्छिक (Optional) विषयांपैकीच एक विषय विशेष स्तरावरील अध्ययनासाठी निवडावयाचा आहे. या ऐच्छिक विषयांचे ५ पेपर्स असतील याशिवाय इंग्रजी हा एक आवश्यक (Compulsory) विषय घ्यावा लागेल. प्रत्येक विषयाची परीक्षा सेमिस्टर पद्धतीने विद्यापीठामार्फत घेतली जाईल. पहिल्या सत्रात ऑक्टोबर / नोव्हेंबरमध्ये पाचवी सेमिस्टरची परीक्षा तर मार्च/एप्रिल मध्ये सहावी सेमिस्टरची परीक्षा घेतली जाईल. प्रत्येक सेमिस्टरमध्ये प्रत्येक विषयाची ४० गुणांची लेखी परीक्षा विद्यापीठांमार्फत घेण्यात येतील. पाचव्या सेमिस्टरसाठी प्रत्येक पेपरसाठी १० गुणांची चर्चासत्र (Seminar) महाविद्यालयामार्फत घेण्यात येतील.

सहाव्या सेमिस्टरसाठी प्रत्येक पेपरसाठी १० गुणांचा गट प्रकल्प (Group Project) महाविद्यालयामार्फत घेण्यात येईल. विद्यार्थिनीला उत्तीर्ण होण्यासाठी लेखी परीक्षेत ४० पैकी किमान १४ गुण व महाविद्यालयीन चर्चासत्र /गट प्रकल्प परीक्षेत किमान१० पैकी ४ गुण मिळविणे आवश्यक आहे. मात्र या दोन्ही परीक्षेत स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाने सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून सेमीस्टर ५ साठी 'भारतीय राज्यघटना' (Constitution of India) हा विषय सक्तीचा केला आहे. हा विषय या वर्गातील विद्यार्थीनींनी स्वयंअध्ययन पद्धतीने अभ्यासावयाचे आहे. भारतीय राज्यघटना या विषयाची ५० गुणांची लेखी परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्यात येईल. या परीक्षेसाठी ५० गुणांचे वैकल्पिक प्रश्न असून विद्यार्थीनींनी उत्तीर्ण होण्यासाठी किमान २० गुण मिळविणे आवश्यक आहे. सदरची परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय विद्यार्थीनीला बी. ए. ची पदवी मिळणार नाही. याची सर्व विद्यार्थीनींनी नोंद घ्यावी.

## – वाणिज्य विभाग –

या विभागामध्ये बी. कॉम्. पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम शिकविला जातो. हा अभ्यासक्रम एकूण ३ वर्षांचा असून बी. कॉम्. भाग १, बी.कॉम्. भाग २, बी. कॉम्. भाग ३ या तीन वर्गासाठीची परीक्षा विद्यापीठामार्फत घेतल्या जातात.

विद्यार्थिनीने एकदा निवडलेला विषय तिला बदलता येणार नाही. काही अपरिहार्य विशेष परिस्थितीत तो बदलावयाचा असेल तर प्राचार्यांच्या व संबंधित विषय विभाग प्रमुखाच्या लेखी पूर्वसंमतीने ३० जुलै पर्यंतच विषय बदलता येईल. प्रवेशाच्या वेळी निवडलेले विषय हेच विद्यापीठाच्या परीक्षा फॉर्ममध्ये भरणे बंधनकारक आहे. कोणत्याही विषयामध्ये परस्पर बदल केल्यास होणाऱ्या नुकसानीस संबंधित विद्यार्थीनी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

प्रवेश विषयक –

बी. कॉम्. भाग – १ **(B. Com. Part I)** (सेमिस्टर १ व २)

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची कला, वाणिज्य,विज्ञान, व्होकेशनल शाखेची इ. १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण

किंवा

इतर विद्यापीठाची अथवा परीक्षा मंडळाची शिवाजी विद्यापीठाने १२ वी ला समकक्ष (Equivalent) मानलेली परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस बी. कॉम्. भाग १ या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळू शकेल.

बी. कॉम्. भाग – २ **(B. Com. Part II)**

शिवाजी विद्यापीठाची बी. कॉम. भाग १ ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा अन्य विद्यापीठाची शिवाजी विद्यापीठाने बी. कॉम. भाग–१ ला समकक्ष (Equivalent) मानलेली परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस बी. कॉम. भाग–२ च्या अभ्यासक्रमास प्रवेश मिळू शकेल. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या बी. कॉम. भाग–१ च्या परीक्षेमध्ये ए.टी.के.टी. मिळालेल्या विद्यार्थिनीसही बी. कॉम. भाग–२ च्या अभ्यासक्रमास प्रवेश मिळू शकेल.

बी. कॉम्. भाग – ३ **(B. Com. Part III)**

शिवाजी विद्यापीठाची बी. कॉम. भाग २ ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा अन्य विद्यापीठाची शिवाजी विद्यापीठाने बी. कॉम. भाग–२ ला समकक्ष (Equivalent) मानलेली परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस बी. कॉम. भाग–३ च्या अभ्यासक्रमास प्रवेश घेता येईल. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या बी. कॉम. भाग–२ च्या परीक्षेमध्ये ए.टी.के.टी. मिळालेल्या विद्यार्थिनीलाही बी. कॉ. भाग–३ च्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळू शकेल.

अभ्यासक्रम विषयक –

बी. कॉम्. भाग – १ (सेमिस्टर १ आणि २)

शिवाजी विद्यापीठ सन २०१८–१९ पासून बी. कॉम् भाग –१ ची परीक्षा पॅटर्न सेमिस्टर पद्धतीने घेत आहे. बी.कॉम. भाग १ चा अभ्यासक्रम खाली नमूद केल्याप्रमाणे आहे. या वर्गासाठी प्रत्येक सत्रासाठी एकूण सहा पेपर्स असतील. प्रत्येक पेपर ५० गुणांचा असेल. या परीक्षा शिवाजी विद्यापीठामार्फत घेतल्या जातात. विद्यार्थिनींना पास होण्यासाठी लेखी परीक्षेत ५० पैकी किमान १८ गुण मिळविणे आवश्यक आहे. पहिल्या सत्रात पहिली सेमिस्टर परीक्ष ऑक्टोबर/नोव्हेंबर मध्ये घेण्यात येईल व दुसऱ्या सत्रात दुसरी सेमिस्टर परीक्षा मार्च /एप्रिल मध्ये घेण्यात येईल.

बी. कॉम. भाग – १ (सेमीस्टर १ व २ साठी असणारे विषय)

1 English for Business Communication (Paper I & II)

2 Principles of Marketing (Paper I & II) विपणनाची तत्वे किंवा Marathi मराठी (Paper I & II)

3 Insurance विमाशास्त्र (Paper - I & II)

4 Micro Economics सूक्ष्म अर्थशास्त्र (Paper - I & II)

5 Management Principles and Application व्यवस्थापन तत्वे व उपयोजन (Paper I & II)

6 Financial Accounting (Paper I & II) वित्तीय लेखा

**Shivaji University, Kolhapur**

**Choice Based Credit Sytem (CBCS)**

B. Com. Sem I & II (Implemented from accademic year 2018-19)

| **Semester I** | | **Semester II** | |
|---|---|---|---|
| **Course Code** | **Course (Subject)** | **Course Code** | **Course (Subject)** |
| **Core course** | | | |
| **CC-A1** | Micro Economics Paper- I | **CC-A2** | Micro Economics Paper- II |
| **CC-A3** | Management Principles & Applications Paper- I | **CC-A4** | Management Principles & Applications Paper- II |
| **CC-A5** | Financial Accounting Paper-I | **CC-A6** | Financial Accounting Paper-I I |
| **Group A** | | | |
| **GEC-A1** | Principles of Marketing Paper- I | **GEC- A2** | Principles of Marketing Paper- II |
| **GEC-A5** | Marathi Paper- I | **GEC- A6** | Marathi Paper- II |
| **Group B** | | | |
| **GEC- B3** | Insurance Paper- I | **GEC-B4** | Insurance Paper- II |
| **Ability Enhancement Compulsory Course** | | | |
| **AECC-C1** | Business Communication Paper- I | **AECC- C2** | Business Communication Paper- II |

**Note :**

1. **CC** : Core Course : All courses (subjects) are compulsory. **2.**
**GEC** : Generic Elective Course : Candidate has to select any one course (Subject) from Group A & B. **3.**
**AECC** : Ability Enhancement Compulsory Course : All courses (subjects) are compulsory.

बी. कॉम्. भाग – २ (सेमिस्टर ३ आणि ४)

या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीस सात विषयांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. पहिल्या सत्रात तिसरी सेमिस्टर परीक्षा ऑक्टोबर / नोहेंबर मध्ये घेण्यात येईल व दुसऱ्या सत्रातील चौथी सेमिस्टर परिक्षा मार्च / एप्रिल मध्ये घेण्यात येईल या दोन्ही सेमिस्टर मधील प्रत्येक विषयाची लेखी परीक्षा ५० गुणांची असेल विद्यार्थिनीस पास होण्यासाठी ५० किमान १८ गुण मिळविणे आहे.

सेमिस्टर ३ व ४ साठी असणारे विषय खालीलप्रमाणे

1 English for business Communication (Paper - III & IV)
2 Environmental Studies पर्यावरण अभ्यास
3 Business statistics (Paper - I & II) संख्याशास्त्र
4 Macro Economics (Paper - III & IV) स्थूल अर्थशास्त्र
5 Corporate Accounting (Paper - I & II) कॉपोरेट लेखा
6 Money & Financial system (Paper - I & II) पैसा आणि वित्तिय रचना
7 Fundamentals of Entrepreneurship (Paper - I & II) उद्योजकतेची मूलतत्वे

पर्यावरण अभ्यास **(Environmental Studies)**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठ अनुदान मंडळाने 'पर्यावरण अभ्यास' हा विषय बी.कॉम भाग–२ या वर्गासाठी सन २००५–२००६ या शैक्षणिक वर्षापासून अनिवार्य केलेला आहे. 'पर्यावरण अभ्यास' या विषयामध्ये पास झाल्याशिवाय विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र मिळणार नाही. नेहमीच्या ६०० गुणांच्या परीक्षेशिवाय ही १०० गुणांची परीक्षा द्यावी लागेल. त्यापैकी ७० गुणांची लेखी परीक्षा विद्यापीठामार्फत मार्च/एप्रिल सेमिस्टर चार मध्ये घेतली जाईल, व ३० गुणाचे क्षेत्र भेटीवर आधारित प्रकल्प (Project work) असेल. तसेच या दोन्ही परीक्षेत स्वतंत्रपणे पास होणे आवश्यक श्रेणीस्वरूपात त्याचा निकाल दिला जातो. पर्यावरण अभ्यास या विषयाची लेखी परीक्षा सेमिस्टर चार मध्ये घेतली जाईल. ही लेखी परीक्षा ७० गुणाची असेल आणि पास होण्यासाठी ७० पैकी २८ गुण मिळविणे आवश्यक आहेत तसेच ३० गुणांचा प्रकल्प असेल आणि पास होण्यासाठी ३० पैकी किमान १२ गुण मिळविणे आवश्यक आहे.

Shivaji University, Kolhapur

**Choice Based Credit Sytem (CBCS)**

B. Com. Sem III & IV (Implemented from accademic year 2019-20)

| Semester III | | Semester IV | |
|---|---|---|---|
| **Course Code** | **Course (Subject)** | **Course Code** | **Course (Subject)** |
| **Core course** | | | |
| **CC-B1** | Corporate Accounting Paper- I | **CC-B2** | Corporate Accounting Paper- II |
| **CC-B3** | Fundamentals of Entrepreneurship Paper- I | **CC-B4** | Fundamentals of Entrepreneurship Paper- II |
| **CC-B5** | Money and Financial System Paper- I | **CC-B6** | Money and Financial System Paper- II |
| **CC-B7** | Macro Economics Paper- I | **CC-B8** | Macro Economics Paper- II |
| **Ability Enhancement Compulsory Course** | | | |
| **AECC-C3** | Business Communication Paper- III | **AECC-C4** | Business Communication Paper- IV |
| **AECC-C5** | Business Statistics Paper- I | **AECC-C6** | Business Statistics Paper- II |
| **AECC-EVS** | Environmental Studies | **AECC-EVS** | Environmental Studies |

**Note :**

1. **CC** : Core Course : All courses (subjects) are compulsory. **2.** **AECC** : Ability Enhancement Compulsory Course : All courses (subjects) are compulsory. **3.** **AECC – EVS** : Ability Enhancement Compulsory Course – Environmental Studies

बी. कॉम्. भाग – ३ (सेमीस्टर ५ आणि ६)

या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीस सहा विषयांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. यापैकी चार विषय आवश्यक असून दोन विषय ऐच्छिक आहेत. यामध्ये Banking आणि Accountancy या विषयापैकी एका विषयाची निवड विद्यार्थिनीस करावी लागेल. विद्यापीठामार्फत सेमिस्टर ५ व ६ साठी ४० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाते व १० गुणांची महाविद्यालयामार्फत अंतर्गत मूल्यमापन परीक्षा असेल. विद्यार्थिनीला लेखी परीक्षेत पास होण्यासाठी ४० पैकी किमान १४ गुण व महाविद्यालयीन अंतर्गत मूल्यमापन परीक्षेत १० पैकी किमान ४ गुण मिळविणे आवश्यक आहे. या दोन्ही परीक्षेत विद्यार्थिनीला स्वत्रंतपणे पास होणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाने सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून सेमीस्टर ५ साठी 'भारतीय राज्यघटना' (Constitution of India) हा विषय सक्तीचा केला आहे. हा विषय या वर्गातील विद्यार्थीनींनी स्वयंअध्ययन पद्धतीने अभ्यासावयाचे आहे. भारतीय राज्यघटना या विषयाची ५० गुणांची लेखी परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्यात येईल. या परीक्षेसाठी ५० गुणांचे वैकल्पिक प्रश्न असून विद्यार्थीनीनी उत्तीर्ण होण्यासाठी किमान २० गुण मिळविणे आवश्यक आहे. सदरची परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय विद्यार्थीनीला बी. कॉम. ची पदवी मिळणार नाही. याची सर्व विद्यार्थीनींनी नोंद घ्यावी.

सेमिस्टर ५ व ६ साठीचे विषय खालीलप्रमाणे.

**Compulsory Subject** – सक्तीचे विषय

1) Businesss Regulatory Frame Work Law व्यवसाय नियमनविषयक कायदा
2) Business Environment व्यावसायिक पर्यावरण
3) Co-operative Development सहकाराचा विकास
4) Modern Management Practices आधुनिक व्यवस्थापन पद्धती

**Optional Subject** – ऐच्छिक विषय

5) Advanced Accountancy Paper - I
6) Advanced Accountancy Paper - II

**OR**

5) Advanced Banking Paper - I
6) Advanced Banking Paper - II

अन्य महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या प्रवेशाबाबत

१) शिवाजी विद्यापीठास संलग्न असलेल्या अन्य कोणत्याही महाविद्यालयातील विद्यार्थिनीला या महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी पूर्वी शिकत असलेल्या महाविद्यालयाकडून संस्थांतर दाखला (Transference Certificate) सादर करणे आवश्यक आहे. असा संस्थांतर दाखला सादर करेपर्यंत त्या विद्यार्थिनीचा या महाविद्यालयातील प्रवेश केवळ तात्पुरता (Provisional) समजणेत येईल.

२) महाराष्ट्र राज्यातील शिवाजी विद्यापीठाखेरीज अन्य विद्यापीठातील तसेच महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त अन्य राज्यातील विद्यार्थिनीला या महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) स्थलांतर दाखला (Migration Certificate)
२) संस्थांतर दाखला (Transference Certificate)

या कागदपत्राची पूर्तता करणे ही विद्यार्थिनीची वैयक्तिक जबाबदारी राहील व शिवाजी विद्यापीठाने विहित केलेल्या वेळेत त्यांनी या कागदपत्रांची पूर्तता केली नाही; तर त्यामुळे होणाऱ्या परिणामास विद्यार्थिनी स्वत: जबाबदार राहील.

फीसंबंधीचे नियम

विद्यार्थिनीला महाविद्यालयाात प्रवेश घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमानुसार प्रवेश फी भरावी लागेल. सोबत प्रत्येक वर्गासाठीचा अनुदानीत व विनाअनुदानीत प्रवेश फी चा तक्ता जोडला आहे. विनाअनुदानीत तुकडीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीस ट्युशन फी दोन हप्त्यामध्ये भरण्यासाठी सवलत दिली जाईल.

१) इ. १२ वी उत्तीर्ण होऊन बी. ए. भाग १ अथवा बी. कॉम. भाग १ या वर्गात प्रवेश घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थिनीस प्रवेश अर्जासोबत वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या शुल्क व्यतिरिक्त पात्रता प्रमाणपत्र फी म्हणून रू. ७५/– भरावे लागतील.

२) महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थिनीस पात्रता प्रमाणपत्र शुल्क रू. ३००/– इतके भरावे लागेल.

३) परदेशी विद्यार्थिनीस पात्रता प्रमाणपत्र शुल्क डॉलर्स १०० इतके भरावे लागेल.

४) डी. एड्. उत्तीर्ण होऊन येणाऱ्या विद्यार्थिनीस पात्रता प्रमाणपत्र शुल्क रू. ३००/– इतके भरावे लागेल.

५) बी. ए. भाग – २ व बी. कॉम भाग – २ या वर्गातील विद्यार्थिनींना विद्यापीठ नियमानुसार पर्यावरण अभ्यास ह्या नवीन आवश्यक जादा विषयासाठी रू. २७५/– इतके शुल्क भरावे लागेल.

६) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या (ई.बी.सी.) मागास वर्गीय (बी. सी.) विद्यार्थिनींना शैक्षणिक फी मध्ये सवलत आहे.

७) विना अनुदानित तुकडीतील विद्यार्थिनीना ट्युशन फी विद्यापीठ नियमानुसार भरावी लागेल.

८) मानसशास्त्र बी. ए. भाग ३ ची प्रयोगशाळा फी विद्यापीठ नियमाप्रमाणे घेतली जाईल.

Latthe Education Society's

**Smt. Gangabai Khivaraj Ghodawat Kanya Mahavidyalaya, Jaysingpur**

**B. Com. I Senior Non - Grantable Wing Fee Structure 2020-2021**

| | | 2020-2021 | B. Com. I (N.G.) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Receipt Item | Paying | RCSM (EBC) /SST/PTC/ Ex-Ser | SC/ST/NT/OBC/SBC/ Sch & Free |
| 1 | | Admission Fee | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 2 | Tuition Fee | | | | |
| | 1 | Human Resources | 4000.00 | 4000.00 | 4000.00 |
| | 2 | Knowledge Resources | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 3 | Overhead & any other Charges | | 200.00 | 200.00 | 200.00 |
| 4 | | Library Fee | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 5 | | Gymkhana Fee | 150.00 | 150.00 | 150.00 |
| 6 | | Test & Terminal Exam Fee | 20.00 | 20.00 | 20.00 |
| 7 | | Magazine Fee | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 8 | | Association Fee | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 9 | | S. A. Fund | 25.00 | 25.00 | 25.00 |
| 10 | | Cultural Fee | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 11 | | University Pro-rata Fee | 25.00 | 25.00 | 25.00 |
